गुरुवार, दि. ३१ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३५५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची ठाणे येथे बदली

## श्रीमती अशिमा मित्तल यांची जालनाच्या नुतन जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** राज्य शासनाने केलेल्या प्रशासकीय बदल्यांच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्याचे विद्यमान जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची बदली ठाणे जिल्हाधिकारीपदी करण्यात आली आहे. तर त्यांच्या जागी श्रीमती अशिमा मित्तल (भाप्रसे) यांची नवीन जिल्हाधिकारी जालना म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांचा जालना जिल्ह्यातील कार्यकाळ उल्लेखनीय ठरला. त्यांच्या काळात विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी, जिल्ह्यातील प्रशासनात पारदर्शकता व गती, तसेच दुष्काळ व्यवस्थापन, आरोग्य सेवा व शिक्षण क्षेत्रातील प्रयत्न उल्लेखनीय मानले जात आहेत. जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटनांनी वेळोवेळी त्यांच्या कार्यपद्धतीचे कौतुकही केले.



नविन जिल्हाधिकारी श्रीमती अशिमा मित्तल या एक भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी आहेत, ज्या नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होत्या.

अशिमा मित्तल ह्या मूळच्या जयपूर, राजस्थान येथील आहेत. त्यांनी आयआयटी मुंबईतून सिव्हिल इंजिनीअरिंगची पदवी घेतली आहे. त्या त्यांच्या बॅचच्या टॉपर आणि गोल्ड मेडलिस्ट होत्या.

पदवीनंतर त्यांनी काही काळ खासगी क्षेत्रात, एका व्यवस्थापन सल्लागार (Management Consultant) कंपनीत काम केले.

समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा असल्याने त्यांनी प्रशासकीय सेवेत येण्याचा निर्णय घेतला., त्यांनी तीन वेळा यूपीएससी परीक्षा दिली. पहिल्या प्रयत्नात त्या मुलाखतीपर्यंत पोहोचल्या, पण अंतिम यादीत काही गुणांनी कमी पडल्या. दुसऱ्या प्रयत्नात त्यांची रँक ३२८ होती आणि त्यांची इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिसेस (IRS) मध्ये निवड झाली. त्यांनी आयकर विभागात प्रशिक्षणही घेतले.

मात्र, आयएएस अधिकारी होण्याचे त्यांचे ध्येय कायम होते. त्यामुळे त्यांनी प्रशिक्षण घेत असतानाच तिसऱ्यांदा तयारी केली.

तिसऱ्या प्रयत्नात त्यांनी अखिल भारतीय स्तरावर (All India Rank) १२ वी रँक मिळवून आपले आयएएस होण्याचे स्वप्न पूर्ण केले.

आयएएस प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी पालघर जिल्ह्यातील डहाणू येथे सहाय्यक जिल्हाधिकारी आणि प्रकल्प अधिकारी म्हणून दोन वर्षे काम केले.

या काळात त्यांनी आश्रमशाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी, महिला बचत गटांना बळकट करण्यासाठी पान २ वर

# ऑनलाईन जुगारावर बंदीसाठी केंद्राकडे प्रस्ताव पाठवणार !

गोवा व छत्तीसगड राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचे आश्वासन !

**पणजी -** देशभरात झपाट्याने वाढणार्या ऑनलाईन जुगारामुळे ('रिअल मनी गेमिंग'मुळे) लाखो कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. काही हजार कोटी रुपयांची लुट होत आहे. यावर केवळ राज्यात कायदा करणे पुरेसे नसून राष्ट्रीय स्तरावर कठोर आणि प्रभावी कायदा करण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठी हिंदु जनजागृती समितीच्या 'सुराज्य अभियाना'च्या वतीने गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, तसेच छत्तीसगडचे मुख्यमंत्री श्री. विष्णुदेव साय यांची प्रत्यक्ष भेट घेऊन राष्ट्रीय स्तरावरील कायदा करण्यासाठी भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद २५२ अंतर्गत केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर करण्याची मागणी केली आहे. त्यानुसार दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले आहे.

छत्तीसगडमध्ये हिंदु जनजागृती समितीचे छत्तीसगड आणि महाराष्ट्र राज्य संघटक श्री. सुनील घनवट, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष आणि स्वा. सावरकारंचे नातू श्री. रणजीत सावरकर, सर्वश्री गोविंद साहू, रोहित तिरंगा, हेमंत कानस्कर, प्रसाद वडके, परवेश तिवारी, अंकित द्विवेदी, अजयसिंह ठाकूर आणि आशिष परीडा उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. साय यांनी या विषयाची गंभीर नोंद घेत प्रस्ताव पुढे पाठवण्याचे आश्वासन दिले आहे.

तर गोवा राज्यात 'सुराज्य अभियान'च्या शिष्टमंडळामध्ये सर्वश्री राजेंद्र देसाई, नारायण नाडकर्णी, मनोज गावकर, सुचेंद्र अग्नी, स्वप्नील नाईक, सत्यविजय नाईक आणि सदाशिव धोंड यांचा समावेश होता. यावर गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केंद्र सरकारला याविषयी प्रस्ताव पाठवणार असल्याचे सांगितले आणि केंद्राकडे प्रस्ताव पाठवण्याचे निर्देशही संबंधित अधिकाऱ्याला दिले.

### ऑनलाईन जुगारावर नियंत्रणासाठी राष्ट्रव्यापी कायदा करण्याची सुराज्य अभियानाची मागणी

**ऑनलाईन जुगारामुळे झालेली हानी !**

गोवा मेडिकल कॉलेजच्या वर्ष २०२३ च्या अभ्यासानुसार ८% वैद्यकीय विद्यार्थ्यांमध्ये ऑनलाइन गेमिंगचे व्यसन जडले आहे; गोवा राज्य बालहक्क संरक्षण आयोगानुसार २०% गोमंतकीय किशोरवयीन मुलं जुगाराच्या व्यसनात अडकली आहेत; गोव्यातील ४५% हून अधिक प्रौढ पुरुषांनी वर्षभरात जुगार खेळला असून कौटुंबिक व व्यावसायिक दृष्टीने ते अडचणीत आले आहेत; जून २०२५ मध्ये फोंड्यात १९ वर्षीय युवकाने ऑनलाइन जुगारामुळे आत्महत्या केली; सायबर क्राइम सेलने १० महिन्यांत ६७२ बेकायदेशीर वेबसाइट्स व ९३६ मोबाईल फोन बंद केले तरी नव्या प्लॅटफॉर्म्सची वाढ सुरू आहे; वर्ष २०१९ पासून ४४ गुन्हे नोंद झाली आहे; तसेच छत्तीसगड राज्यात २०२५ मध्ये वैभव साहू या २१ वर्षीय तरुणाची पैसे हरल्यामुळे आत्महत्या केली आहे; खैरागड पोलिसांनी जुलै २०२५ मध्ये नागपूरहून चालवलेल्या २० कोटींच्या ऑनलाईन सट्टा टोळीचा पर्दाफाश केला; छत्तीसगड राज्यात ४४४ गुन्हे नोंद, तर १००० हून अधिक अटक आणि २.२० कोटी रुपयांची जप्ती झाली आहे; 'महादेव प'शी संबंधित ७७ प्रकरणे; आयपीएल क्रिकेटच्या हंगामात दररोज ८ ते १० लाखांचे सट्टा व्यवहार उघडकीस आले आहेत. हीच परिस्थिती देशभरातील प्रत्येक राज्यात गंभीर स्वरूपात असून राष्ट्रीय कायदा तातडीने करण्याची आवश्यक आहे.

**जुगाराच्या ॲप्सच्या आस्थापनाकडे २५ हजार कोटी रुपयांची थकबाकी !**

देशपातळीवर अनेक चित्रपट अभिनेते या ऑनलाईन जुगाराचे विज्ञापन करत असल्यामुळे तरुणांमध्ये याचे आकर्षण वाढले आहे. वर्ष २०२५ मध्ये ५० कोटींपेक्षा अधिक ऑनलाईन जुगार खेळणारे (युजर) भारतीय लोक आहेत. वर्ष २०२४ मधील पान २ वर



जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी भारतीय जनता पार्टी प्रवेशापूर्वी घेतली भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या चित्रकूट निवासस्थानावर भेट.

## खरेदीखता आधारे नामांतर होत नसल्याच्या निषेधार्थ महसूल दिनावर बहिष्कार टाकावा

ॲड. महेश धन्नावत यांचे जनतेला आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात विशेषतः मंठा तहसील कार्यालयात खरेदीखता आधारे (नोंदणीकृत दस्तऐवज) नामांतर न करता अधिकाऱ्यांकडून अनधिकृतरीत्या पैशांची मागणी केली जात असल्याचा आरोप ड महेश धन्नावत यांनी केला असून, याच पार्श्वभूमीवर येत्या महसुल दिनावर नागरिकांनी बहिष्कार टाकावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या ड.धन्नावत यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्र लॅण्ड रेव्हेन्यू कोडच्या कलम १४९ ते १५४ अंतर्गत, नोंदणीकृत दस्तऐवजाच्या आधारे नामांतर करणे हे महसुल अधिकाऱ्यांवर बंधनकारक आहे. मात्र, जालन्यात हे नियम पाळले जात नसून, नागरिकांना खरेदीखत दाखवूनही लाच द्यावी लागते. महत्त्वाचे म्हणजे लोकायुक्तांनीही जालना येथील महसुल पान २ वर




## मोकाट कुत्र्यांचा मोकळा कारभार!

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात मोकाट कुत्र्यांनी पुन्हा एकदा आपली सत्ता गाजवली आहे! यावेळी कोणताही सामान्य नागरिक नव्हे, तर थेट महानगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक खर्डेकर हेच त्यांच्या हल्ल्याचे बळी ठरले!

घटना रेल्वे स्टेशन ते उड्डाणपूल रस्ता आणि वेळ सकाळची, म्हणजेच कुत्र्यांचा राजकीय दौरा सुरू असतो तो वेळ काळ!

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, कुत्र्यांचे टोळके स्वच्छतेवर नाराज होते, कारण त्यांना साफ सफाई करणे हा त्यांचा अपमान मानला जातो. म्हणूनच खर्डेकर यांच्यावर हल्ला करून त्यांनी स्वच्छता नको आम्हाला - सत्ताच पाहिजे! असा तर संदेश दिला नसेल ना? राजकीय पान २ वर

## डॉ. कल्याण काळे यांची प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार डॉ. कल्याण वैजिनाथराव काळे यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदाची मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीचे विविध स्तरांमधून स्वागत होत असून, पक्षांतर्गत व बाह्य राजकीय वर्तुळातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



डॉ. काळे यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, स्पष्ट विचारसरणी आणि जनतेशी असलेले सखोल नाते यांची दखल घेत काँग्रेस पक्षाने त्यांच्यावर विश्वास टाकला आहे, असे पान २ वर

युवा आदर्श

### वायुसूता ...

हनुमानासम हवी
गाढ श्रीराम भक्ती
राम नाम ना जिथे
क्षुल्लक हिरेमोती
राम पायाशी लीन
असूनि भारी शक्ती
दास बनणे आवडे
अशी स्नेह आसक्ती
राम नाम सळसळे
नसानसांत रे रक्ती
रामराय मंदिर कुठे
फाडून दावी छाती
दुताची अशी युक्ती
भेटली पत्नी पती
लंका दहन करता
बिथरला लंकापति
सेतू बांधला सहज
करत राघव स्तुती
जळेलंका उठेंडका
मुक्त वानराधिपती
दूत रामाचा म्हणून
आवडे तुज ख्याती
चिरंजीवी भगवंता
थोर तिन्ही जगती
तुच्छ आहो अगदी
सेवक तुझे मारुती
वायुसूता आम्हांवर
सदैव रहावी प्रिती

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मराठवाड्यात ३ हजार रुग्णांना २५ कोटींची मदत

आरोग्य शिबिरातून १२ हजार नागरिकांना दिलासा

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरीब रुग्णांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष हा मोठा आधार बनला आहे. विशेषतः मराठवाडा विभागात जानेवारी ते जून २०२५ या अवघ्या सहा महिन्यांत तब्बल ३ हजार ३९ रुग्णांना २५ कोटी ५८ लाख ३१ हजार रुपयांची वैद्यकीय मदत करण्यात आली आहे.


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून नागरिकांचा विचार करून जिल्हा कक्ष स्थापन करण्यात आले. त्यातून लाभार्थी नागरिकांची संख्या वाढली. त्यासोबतच आरोग्य शिबिर व रक्तसंकलन आदी उपक्रम प्रभावीपणे राबविणे सहज शक्य होत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुखरामेश्वर नाईक यांनी सांगितले.

**जिल्हानिहाय मदत**

मागील सहा महिन्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ६३३ रुग्णांना ५ कोटी ३३ लाख ३८ हजारांची मदत करण्यात आली. बीड -६१० रुग्णांना ४ कोटी ८९ लाख ६ हजार, परभणी ५३३ रूग्णांना ४ कोटी ६७ लाख ८२ हजार, लातूर-३८५ रूग्णांना ३ कोटी २९ लाख ५५ हजार, जालना-३६७ रूग्णांना ३ कोटी ११ लाख ४५ हजार, नांदेड-३२३ रूग्णांना २ कोटी ८० लाख २० हजार, धाराशिव-२५७ रूग्णांना २ कोटी २१ लाख आणि हिंगोली-१३२ रूग्णांना १ कोटी १६ लाख रूपये प्रमाणे वैद्यकीय मदत करण्यात आली आहे.

**आरोग्य शिबिरे आणि रक्तदान**

१ मे ते २५ जुलै दरम्यान जिल्हा कक्षाच्या मदतीने घेण्यात आलेल्या आरोग्य व रक्तदान शिबिरांमध्ये १२,४०९ नागरिकांची पान २ वर



संपादकीय पान

# महान संत तुलसीदास

## न फनकार तुझसा, तेरे बाद आया

चार दशकांहून अधिक काळ आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे महान गायक, सूरसम्राट मोहम्मद रफी यांचा स्मृती दिन. मोहम्मद रफी यांचा जन्म २४ डिसेंबर १९२४ ला पंजाब राज्यातील कोटला सुल्तानसिंह या गावात झाला. मोहम्मद रफी यांना लहानपणापासूनच गायनाची आवड होती. मोहम्मद रफी १४ वर्षाचे असताना त्यांचे कुटुंब लाहोरला स्थलांतरित झाले. तिथेच त्यांनी शास्त्रीय संगीतातील दिग्गज गायक उस्ताद बडे गुलाम अली, उस्ताद अब्दुल खान, पंडित जीवनलाल मट्टू आणि फिरोज निजामी या महान शास्त्रीय गायकांकडे संगीताचे धडे गिरवले. पंजाबी चित्रपट गुल बलोच पासून त्यांनी चित्रपट गायनाला सुरवात केली. या चित्रपटातील त्यांच्या आवाजातील गाणी लोकप्रिय झाली. त्यांच्या आवाजाने प्रभावित होऊन फिरोज निजामी यांनी त्यांना लाहोर रेडिओला नोकरीला लावले. ते रेडिओवर गाणी म्हणू लागली. रेडिओवरील त्यांची गाणी ऐकून जे. बी. वाडिया यांनी त्यांना आपल्या बाजार या चित्रपटासाठी पार्श्वगायन करण्याची विनंती केली ती मोहम्मद रफी यांनी मान्य केली. या चित्रपटातील सातही गाणी मोहम्मद रफी यांनीच गायली. ती सर्व गाणी लोकप्रिय झाली. त्याकाळातील लोकप्रिय संगीतकार नौशाद यांनी त्यांना अनेक चित्रपटात संधी दिल्या. पुढे या जोडीने हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवले. संगीतकार नौशाद आणि गायक मोहम्मद रफी म्हणजे चित्रपट सुपरहिट असे समीकरणच बनले. मोहमद रफी यांच्या आवाजाने नौशाद यांच्यावर अक्षरशः मोहिनी घातली होती. ५० च्या दशकात नौशाद रफी साहेबांव्यतिरिक्त कोणत्याही गायकासोबत काम करत नव्हते. या दोघांनी लोकप्रिय संगीताचा वापर करून चित्रपट सृष्टीतील गीतांचे आयामच बदलून टाकले. बैजू बावरा, उडण खटोला, कोहिनूर, मेरे मेहबूब, दिल लिया दर्द दिया, संघर्ष या लोकप्रिय झालेल्या चित्रपटांचे संगीतकार नौशाद आणि गायक मोहम्मद रफी ही जोडी प्रसिद्ध होती. ओ.पी. नय्यर, सचिन देव बर्मन, शंकर जयकिशन, मदन मोहन, रोशन या संगीतकरांचेही मोहम्मद रफी हे आवडते गायक होते. या संगीतकरांनी दिलेले संगीत आणि मोहम्मद रफी यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५० ते १९८० असा सुमारे ४ दशकांचा काळ मोहम्मद रफी यांनी अक्षरशः गाजवला. गुरुदत्त, दिलीपकुमार, राजकपूर, देवानंद, शम्मी कपूर, शशी कपूर, राजेंद्र कुमार, सुनील दत्त, राजकुमार, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, जितेंद्र, विनोद खन्ना, ऋषी कपूर अशा सर्व नायकांना त्यांनी आवाज दिला. या सर्व नायकांना महानायक करण्याचे काम मोहम्मद रफी यांच्या आवाजाने केले. मोहम्मद रफी यांच्या आवाजाने तरुणाईला वेड लावले होते. त्यांची सर्व गाणी इतकी लोकप्रिय झाली की ती आजही गायली जातात, ऐकली जातात. मोहम्मद रफी यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. केवळ हिंदीतच नाही तर उर्दू, पंजाबी, मराठी, तेलगू या भाषांमध्येही त्यांनी गाणी गायली. त्यांची गाणी केवळ भारतातच नव्हे तर जगभर लोकप्रिय झाली. मोहम्मद रफी यांना गायनासाठी सहा वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. भारत सरकारनेही पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. भारत सरकारने त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाचा स्टॅम्पही तयार केला आहे. ३१ जुलै १९८० ला रात्री १० वाजून ५० मिनिटांनी मोहम्मद रफी यांनी जगाचा निरोप घेतला. मोहम्मद रफी यांच्या अंत्ययात्रेत दहा हजारांहून अधिक चाहते उपस्थित होते. २०१३ मध्ये भारतीय हिंदी सिनेमाला १०० वर्ष पूर्ण झाली त्यानिमित्ताने बिबीसी एशिया नेटवर्कने एक सर्व्हे केला. त्यात मोहम्मद रफी हेच हिंदी चित्रपट सृष्टीतील महान गायक म्हणून नावाजले गेले. मोहम्मद रफी हे केवळ गायक म्हणूनच नाही तर व्यक्ती म्हणूनही महान होते. मोहम्मद रफी नेहमीच दुसऱ्यांना मदत करण्यात पुढे असत. त्यांनी काही संगीतकारांसाठी फुकट गाणीही गायली आहेत. रॉयल्टी साठी त्यांनी कधी कोणाला अडवले नाही. त्यांच्या विषयी लता मंगेशकर म्हणतात, मधुर स्वभावाचा सुरीला माणूस. माझे भाग्य आहे की माझी बहुतेक गाणी मी त्यांच्यासोबत गायली आहेत. संगीत न समजणाऱ्या लोकानांही त्यांनी कानसेन बनवले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या सन्मानार्थ आनंद बक्षी यांनी लिहिले होते की, न फनकार तुझसा, तेरे बाद आया, मोहम्मद रफी तू बहोत याद आया.....

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## आरोग्य सेवक (पुरुष) सरळसेवा भरती प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा परिषद अंतर्गत गट-क मधील आरोग्य सेवक (पुरुष) ४0% व ५0% या कोट्यातील सरळसेवा भरती प्रक्रियेबाबत प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांच्या मोठया प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारीच्या अनुषंगाने भरती प्रकियेची पारदर्शक इन कॅमेरा प्रसारमाध्यमांसमोर तक्रारदाराच्या समक्ष सखोल चौकशी करण्यासाठी दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ ते ५ या दरम्यान कै.यशवंतराव चव्हाण सभागृह जि.प.जालना येथे तक्रार निवारण करण्यात येणार आहे. सदरील दिवशी विहित वेळेत तक्रारदारांनी, उमेदवारांनी आवश्यक कागदपत्राच्या पुराव्यानिशी उपस्थित रहावे, असे अवाहन जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांनी केले आहे.

---


श्रावण शुद्ध सप्तमीला म्हणजे या वर्षी ३१ जुलैला गोस्वामी संत तुलसीदास यांची जयंती आहे, त्या निमित्ताने त्यांचे चरित्र थोडक्यात जाणून घेऊया. महान संत तुलसीदास : जन्म इ. सन १६ ऑगस्ट १५११ (विक्रम संवत १५६८), देहत्याग इ. सन ३० जुलै १६२३ ( विक्रम संवत १६८०)

**जन्म आणि बालपण** : उत्तर प्रदेशात हस्तिनापुर येथे आत्माराम आणि हुलसी यांच्या पोटी श्रावण शुद्ध सप्तमीला तुलसीदास यांचा जन्म झाला. ते मातेच्या उदरात बारा महिने होते. जन्माच्यावेळी मूळ नक्षत्र होते, मुखात बत्तीस दात होते, शरीरयष्टी पाच वर्षाच्या बालका सारखी होती, जन्मतः हे मुल रडले नाही तर त्याच्या मुखातून 'राम' हे नाम आले. अशा अद्भुत परंतु दुश्चीन्हांमुळे आई-वडिलांनी त्या मुलाला सुवर्णदानासह चुनिया नामक दासीला देऊन टाकले. नंतर मुलाची माता हुलसी हिचे निधन झाले. चुनिया दासीने मुलाचा पाच वर्षे सांभाळ केला. नंतर तिचा देखील मृत्यू झाला. हा बालक एकाकी जीवन जगत होता, तेव्हा स्वतः जगज्जननी पार्वतीने एका ब्राह्मण स्त्रीच्या वेशात येऊन त्या मुलाला नरसिंहदास या साधूच्या स्वाधीन केले. त्याने त्या मुलाचे संगोपन केले. पुढे श्री शिवशंकराने नरहर्यानंदांना दृष्टांत देऊन त्या मुलाचे उपनयन करण्यास सांगितले. उपनयनानंतर मुलाचे नाव रामबोला ठेवण्यात आले. तेच तुलसीदास.

**अध्ययन** : अयोध्येत बारा वर्षे श्री गुरूच्या सान्निध्यात राहून त्यांनी वेदशास्त्रांचे अध्ययन पूर्ण केले. नंतर ते हस्तिनापुरास गेले. आत्माराम दुबे या त्यांच्या वडिलांची तेथे भेट झाली. आत्माराम अकबर दरबारी होते, ते एकदा तुलसीदासाला अकबराकडे घेऊन गेले. अकबर बादशहाची तुलसीदासावर खूपच मर्जी बसली. बादशहा तुलसीदासाला शिकारीसाठी आपल्याबरोबर घेऊन जात असे.

**वैवाहिक जीवन आणि वैराग्य** : तुलसीदासांचे वडील आत्माराम यांनी तुलसीदासाचे एका श्रीमंताच्या मुलीशी डामडौलाने लग्न लावून दिले, तिचे नाव रत्नावली होते. त्या दोघा पती-पत्नीचे एकमेकांवर अतिशयच प्रेम जडले. तुलसीदास यांना तिच्यावाचून घटकाभरही चैन पडत नसे.

एके दिवशी तुलसीदास अकबर बादशहाबरोबर दूरच्या देशी गेले असता रत्नावली बोलावणे आल्यामुळे माहेरी गेली. तुलसीदास घरी परतले तेव्हा रत्नावली माहेरी गेल्याचे त्यांना सांगण्यात आले. ते तसेच सासुरवाडीस जाण्यास निघाले. तिथे पोहोचेपर्यंत दोन प्रहर रात्र झाली. घरातील सर्व माणसे दारे लावून झोपी गेली होती. तुलसीदास विचार करू लागले. आत प्रवेश कसा करावा? रत्नावलीस भेटण्यास ते अगदी उत्सुक झाले होते. एक सर्प खिडकीस वेढा देऊन लोंबत असलेला त्यांच्या दृष्टीस पडला. त्याला धरून तुलसीदास आत गेले. घरातील माणसे जागी झाली. तुलसीदास आल्याचे रत्नावलीस तिच्या आईने सांगितले. ती तुलसीदासांकडे आली व म्हणाली, ''सारे दरवाजे बंद असता आपण आत कसे आलात?'' यावर तुलसीदास म्हणाले, ''तू जो दोर मला आत येण्यासाठी लोंबत ठेवला होतास, त्या दोराला धरून मी आलो.'' हे ऐकून रत्नावलीस नवल वाटले. ती खिडकीपाशी जाऊन पाहते तो एक मोठा सर्प लोंबत असलेला तिच्या दृष्टीस पडला. तेव्हा ती तुलसीदासांना म्हणाली, ''प्राणनाथ, तुम्ही माझ्यावर जेवढ प्रेम करता, तेवढ जर श्रीरामाच्या ठायी ठेवाल, तर तुमच्या जन्माचे सार्थक होईल.'' ते तीचे उद्गार ऐकून तुलसीदास विरक्त झाले. त्यांच्या मनात वैराग्य उत्पन्न झाले. ते तसेच तिथून निघाले. आनंदवनास गेले. तिथे त्यांनी बारा वर्षे तपश्चर्या केली. नंतर ते रामकथा कथन करू लागले.



**राम दर्शनाची ओढ** : एकदा तुलसीदासांना पिशाच्च भेटले. पिशाच्चाने ''तुला काय हवे?'' म्हणून तुलसीदासांना विचारले. ''रामाची भेट करून दे.'' असे तुलसीदासांनी सांगताच ते पिशाच्च मागे मागे जाऊ लागले. दूर जाऊन त्यांना म्हणाले, ''तू ज्या ठिकाणी पुराण ऐकावयास जातोस, तिथे एक म्हातारा ब्राह्मण हातात काठी घेऊन सर्वांच्या आधी येऊन बसतो व सर्वजण गेल्यावर निघून जातो. तो तुला रामाची भेट करवील. तो प्रत्यक्ष हनुमान आहे.'' असे सांगून पिशाच्च अदृश्य झाले.

दुसऱ्या दिवशी पुराण आटोपल्यानंतर तो ब्राह्मण जात असता तुलसीदासांनी त्याला मार्गात गाठून साष्टांग नमस्कार घातला. ''मी गरीब ब्राह्मण आहे. तुला देण्याकरता माझ्याजवळ काही नाही.'' असे ब्राह्मणाने म्हणताच तुलसीदास म्हणाले, ''तुम्ही हनुमान आहात. श्रीरामाचे दर्शन तुम्ही मला करून द्यावे.'' वाल्मिकीने अवतार घेतलेला हा तुलसीदास आहे, असे हनुमंताने ओळखले. त्यांना हनुमंताने प्रेमाने आलिंगन दिले. लवकरच श्रीरामाची भेट करवितो असे सांगून हनुमान अदृश्य झाले. हनुमंताने श्रीरामचंद्रांना सांगितले, ''तुमच्या आज्ञेवरून वाल्मिकीने तुलसीदास या नावाने अवतार घेतला आहे. त्यांना तुमच्या दर्शनाची तळमळ लागली आहे.'' तेव्हा प्रभू रामचंद्रांनी तुलसीदासांना वाल्मिकींनी वर्णन केलेल्या रुपात दर्शन देऊन आलिंगन दिले. त्यांच्या मस्तकावर हात ठेवून ते अदृश्य झाले.

**रचना** : तुलसीदासांना कवी म्हणून हिंदी साहित्यात श्रेष्ठ स्थान आहे. तुलसीदासाएवढा दुसरा कोणी लोकप्रिय कवी भारतात मध्ययुगात झालेला नाही. त्यांच्या रचनांनी गरीबाच्या झोपडीपासून श्रीमंताच्या महालापर्यंत सगळीकडे सारखाच प्रवेश केला आहे.

ते रामचरितमानस, अयोध्याकांड, सुंदरकांड इत्यादी महान आध्यात्मिक ग्रंथांचे रचयिते आहेत.

हनुमान चालीसा ची रचना तुलसीदासांनी केली. तुलसीदास यांना हनुमंताने विनयपदे लिहिण्याची आज्ञा केली. ती मान्य करून त्यांनी 'विनय-पत्रिका' नामक श्रेष्ठ काव्य रचिले.

संत तुलसीदास यांनी वाल्मिकी रामायणाला हिंदी पेहराव चढविला. तेच आहे तुलसीदास कृत ''श्रीरामचरितमानस'.'

इ.सन १५७४ (संवत १६३१) च्या रामनवमी या दिवशी तुलसीदासांनी 'श्रीरामचरितमानस' लिहिण्यास प्रारंभ केला. इ. सन १५७६ (संवत १६३३) ला श्रीराम-सीता विवाहदिनी सातही कांडे पूर्ण लिहून झाली.

भगवान श्रीरामाच्या आज्ञेनुसार तुलसीदासांनी काशीला जाऊन श्री विश्वनाथ व अन्नपूर्णेला आपले काव्य वाचून दाखविले व ग्रंथ विश्वनाथाच्या मंदिराच्या गाभार्यात ठेवला. दुसर्या दिवशी ग्रंथावर 'सत्यं शिवं सुंदरम' असे लिहिलेले व त्याखाली 'श्री शंकर' ही अक्षरे दिसली.

**प्रत्यक्ष भगवंतच रक्षक** : तुलसीदासांचे हे काव्य नष्ट करण्याचे काही दुष्टांनी प्रयत्न केले. तो ग्रंथ चोरण्यासाठी त्यांच्या घरी चोरांनाही पाठविण्यात आले. पण दोन धनुर्धर तेथे पहारा देताना त्यांना दिसले. ते बघून चोर पळून गेले. तुलसीदासांनी नंतर तो ग्रंथ आपले जिवलग मित्र तोडरमल यांच्याकडे ठेवला.

**अवतारकार्य** : तुलसीदास यांनी भारतभ्रमण केले. तत्कालीन हिंदु समाजावर झालेले आक्रमण पाहून ते अतिशय दुःखी झाले. त्यानी भारतातील सर्व राजांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न केले. सामान्य लोकांमध्येही त्यानी जनजागृती केली. तुलसीदासांनी रामलीला नाट्य-प्रकारची सुरुवात केली.

**तुलसीदासांची शिकवण** : तुलसीदासांच्या भक्तीमध्ये विनयाला पराकोटीचे स्थान आहे. अहंकार नष्ट होऊन विनम्र झाल्याशिवाय भक्तीतील आनंद अनुभवता येत नाही, अशी त्यांची श्रद्धा आहे. या अहंकाराच्या नाशासाठी आत्मपरिक्षण करून आपल्यातील दोष नष्ट करून आणि गुणवृद्धी करून घेणे आवश्यक आहे. भक्तीसाठी सत्संग, ज्ञान, वैराग्य, तप, संयम, श्रद्धा, प्रेम, भगवत्कृपा, शरणागती या गोष्टीही महत्त्वाच्या मानल्या आहेत. एका तऱ्हेने तुलसीदासांच्या भक्ताचे व्यक्तिमत्त्व एका आदर्श मानवाचे व्यक्तिमत्त्व होऊन जाते.

अशीच साधना ही सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रम्ह डॉ. जयंत आठवले यांनी सांगितली असून त्यानुसार साधक प्रयत्न करून आपली प्रगती करत आहेत.

**श्रीराम चरणी विलीन** : श्रावण वद्य तृतीय, देहत्याग इ.सन ३० जुलै १६२३ ( विक्रम संवत १६८०) तुलसीदासांनी आसी घाटावर श्रीराम नाम घेत देह ठेवला.

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था संपर्क- ९२८४०२७१८०**

---

## पान १ वरुन

### श्रीमती आशिमा ...

आणि आदिवासींचे प्रश्न सोडवण्यासाठी महत्त्वपूर्ण काम केले. डहाणू येथे आयसीयू उभारण्यासाठी सीएसआर फंडातून निधी उभारण्यातही त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांनी डहाणू पर्यटन आणि डहाणू फेस्टिव्हल सारखे उपक्रमही सुरू केले. त्या नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी असतांना त्यांनी बालकल्याणासाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत, ज्यामुळे त्यांना सलग दोन वर्षे बालस्नेही पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी कार्यालयीन सुधारणा आणि ग्रामीण विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यांच्या कार्यकाळात नाशिक जिल्हा परिषदेने १०० दिवसांच्या कार्यक्रमात राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे.

### ऑनलाईन जुगारावर ...

आकडेवारीनुसार ३० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल असलेले क्षेत्र आहे. ऑनलाईन जुगार चालवणारी अनेक आस्थापने विदेशी असून हा सर्व पैसा विदेशात जात असल्याचा आरोप होत आहे. तसेच 'ड्रीम इलेव्हन'सारख्या ॲप्समध्ये विजय मिळवण्याची शक्यता 0.0000१% इतकी अत्यंत नगण्य अर्थात् नाहीच्या बरोबर आहे. त्यामुळे लाखो युवकांची फसवणूक होत आहे. तसेच केंद्र सरकारचा वस्तू आणि सेवा कर (जी.एस.टी.) बुडवल्याच्या प्रकरणी सरकारने ऑनलाइन जुगार चालवणार्या आस्थापनांना ५५ हजार कोटी रुपयांचा कर भरण्याची नोटीस बजावली आहे. त्यात केवळ 'ड्रीम इलेव्हन'ची २५ हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे.

**राष्ट्रव्यापी कठोर कायदा हाच एकमेव प्रभावी उपाय !**

या ऑनलाईन जुगाराच्या विरोधात देशातील केवळ आसाम, तेलंगाणा, आंधप्रदेश आणि तमिळनाडू या राज्यांनी कायदे केले आहेत; मात्र राज्यांनी केलेले कायदे अपुरे पडत असून तमिळनाडूतील कायद्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. एकूणच राज्यनिहाय कायदे अपुरे ठरत असल्याने राष्ट्रव्यापी कठोर कायदा हाच एकमेव प्रभावी उपाय असल्याचे सुराज्य अभियानाचे म्हणणे आहे. दोन राज्यांनी भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद २५२ अंतर्गत केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर केल्यास केंद्र सरकारला असा कायदा करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. त्यामुळे तातडीने राज्यांनी सदर प्रस्ताव पाठवावा यासाठी सुराज्य अभियान प्रयत्नशील आहे.

### खरेदीखता आधारे ...

अधिकाऱ्यांविरोधात भ्रष्टाचाराच्या तक्रारींची गंभीर दखल घेत राज्यपालांकडे कार्यवाहीसाठी शिफारस केली होती. तरीदेखील परिस्थितीत कोणताही बदल झाला नसल्याचे ड. धन्नावत यांनी नमूद केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात तक्रारी दिल्यानंतरही त्याकडे दुर्लक्ष केले जाते. जिल्हाधिकारी वयाने लहान व स्वभावाने नम्र असल्यामुळे महसुल अधिकारी त्यांच्या आदेशांकडे दुर्लक्ष करत आहेत, त्यामुळेच भ्रष्टाचार वाढीस लागला आहे, असा आरोप त्यांनी केला. इतर जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी स्वतः यासंदर्भात लक्ष देत आहेत. परंतु, जालन्यात मात्र नागरिकांना अन्याय सहन करावा लागत आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यातील सर्व नागरिक, ज्यांचे खरेदीखता आधारे अद्याप नामांतर झालेले नाही, त्यांनी महसुल दिनावर बहिष्कार घालावा, असे आवाहन ड. महेश धन्नावत यांनी केले आहे.

### मोकाट कुत्र्यांचा ...

पक्षांसह विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी आधीच महानगर पालिकेला निवेदन देत ईशारा दिला होता की, या मोकाट कुत्र्यांना आवरा, अन्यथा ते तुमच्यावरच धावून येतील पण आयुक्त खांडेकर यांनी 'बघू नंतर' म्हणत कुत्र्यांच्या वाढत्या साम्राज्याकडे दुर्लक्ष केले.

आता, महानगरपालिका कर्मचाऱ्यांनाच स्वतःच्या निष्काळजी धोरणांचा फटका बसतोय!

जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी कुत्र्यांशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला पण कुत्रे म्हणाले, ज्याच्या कारभारात आम्ही वाढलो, त्यालाच चावल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही! पुढचे टार्गेट आयुक्त, पण ते चारचाकी वाहनातून ये-जा करताहेत. त्यामुळे थोडी अडचण होतेय... बघू मनपा कार्यालयात घुसून प्रयत्न करू.

### डॉ. कल्याण काळे ...

मानले जात आहे. ही निवड म्हणजे त्यांच्या राजकीय समर्पणाची व कार्यक्षमतेची अधिकृत पावती आहे.

त्यांचा राजकीय प्रवास अत्यंत समृद्ध व प्रेरणादायी ठरलेला आहे. पंचायत समिती संभाजीनगरचे उपसभापती, देवगिरी सहकारी साखर कारखान्याचे संचालक, तसेच औरंगाबाद पूर्व व फुलंब्री विधानसभा मतदारसंघांतून आमदार म्हणून त्यांनी जनतेची सेवा केली आहे. युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांनी युवकांमध्ये चैतन्य निर्माण केले आणि २०२० पासून औरंगाबाद जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून संघटनात्मक मजबुतीवर भर दिला.

प्रदेश काँग्रेसच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदाच्या माध्यमातून डॉ. काळे आता राज्यपातळीवर संघटनात्मक मजबुती, युवा नेतृत्व विकास आणि सामाजिक सलोखा यांसारख्या मुद्द्यांवर ठोस भूमिका बजावतील, असा विश्वास काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.

### मुख्यमंत्री सहाय्यता ...

आरोग्य तपासणी तर २,३५३ नागरिकांनी रक्तदान केले. आरोग्य शिबीरात छत्रपती संभाजीनगर येथे ३०५८ लाभार्थ्यांनी लाभ घेतला तर १६१ दात्यांनी रक्तदान केले. तर बीड येथे ११०० लाभार्थी, ७५ दात्यांचे रक्तदान, परभणीत ७६३ लाभार्थी, ४६७ दाते, लातूर २५२२ लाभार्थी ८५२ रक्तदाते, जालना येथे ३७३ लाभार्थी, ६४ रक्तदाते, नांदेड २२६ लाभार्थी, ६३९ रक्तदाते, धाराशिव ७४२ लाभार्थी ३८ रक्तदाते, हिंगोलीत ३६२५ लाभार्थी तर ५७ दात्यांनी रक्तदान केले.

**२० गंभीर आजारांकरिता मदत**

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून २० गंभीर आजारांवर मदत केली जातेः त्यात, कॉक्लियर इम्प्लांट, हृदयविकार, किडनी/लिव्हर/बोन मॅरो प्रत्यारोपण, कर्करोग, अपघात, नवजात बालकांचे आजार, मेंदू विकार, डायालिसिस, भाजलेले रुग्ण, विद्युत अपघात आदींचा समावेश आहे.

**जिल्हा कक्षाच्या माध्यमातून मदत**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार पेपरलेस आणि डिजिटल प्रणाली तसेच जिल्हा कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. ज्यामुळे रुग्णांना मंत्रालयात येण्याची गरज भासत नाही.

रुग्णांनी प्रथम महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, किंवा धर्मादाय रुग्णालयांच्या योजनांचा लाभ घ्यावा. जर या योजनांद्वारे उपचार शक्य नसतील, तर, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाकडे संलग्न असणाऱ्या रुग्णालयातून अर्ज करता येतो. यामुळे शासकीय योजनांचा सुयोग्य वापर होतो आणि निधीचा उपयोग खऱ्या गरजू रुग्णांपर्यंत पोहोचतो.

**लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे -** आधार कार्ड, रेशन कार्ड, उत्पन्नाचे प्रमाणपत्र (१.६० लाखांपेक्षा कमी), वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र, रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असावी, अपघात असल्यास एफआयआर किंवा एमएलसी, अवयव प्रत्यारोपण असल्यास झेडटीसीसी नोंदणी पावती, सर्व कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात aao.cmrf-mhgov.in या ईमेल वर पाठवावीत. अधिक माहिती करिता टोल फ्री क्र. १८०० १२३ २२११ या क्रमांकावर कॉल करावा.

# शिवसेनेची मजबुत संघटन बांधणी करा - विनोद घोसाळकर

## आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर शिवसेनेच्या संर्कलनिहाय बैठका

**जालना । प्रतिनिधी -** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती या निवडणुका पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या आहेत. त्यामुळे या निवडणुका जिंकण्यासाठी पक्ष संघटन मजबुत करावे लागणार असल्याचे सांगितले. पक्ष संघटन गठीत करतांना पक्ष संघटनेतील सर्व रिक्तपदे भरावीत, शाखाप्रमुख, केंद्रस्तरीय पदाधिकारी, बुथप्रमुख या सर्व नियुक्त्या करुन पक्ष मजबुत करावा तरच आपण या सर्व निवडणुका चांगल्या प्रकारे लढू शकू, असे प्रतिपादन शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर यांनी केले.

आगामी जिल्हा परिषद,पंचायत समित्या,निवडणुकांच्या पार्श्वभुमीवर शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी जिल्ह्यातील सर्कल निहाय बैठकांचे आयोजन केले. आज ३० जुलै रोजी जालना तालुक्यातील वाघ्रुळ, पिरकल्याण, जाफराबाद तालुक्यातील अकोला देव, टेंभुर्णी, वरुड ब्रुद्रुक, सिपोरा अंभोरा या गटांच्या पदाधिकार्यांच्या बैठका आयोजित केल्या होत्या. या सर्व बैठकांत भाषणांना फाटा देवून थेट कार्यकर्त्यांशी घोसाळकर यांनी संवाद साधला.

यावेळी महिला आघाडी संपर्कप्रमुख ज्योतीताई ठाकरे, उपनेते लक्ष्मण वडले, जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, जिल्हाप्रमुख महेश नळगे, माजी आमदार संतोष सांबरे, उपजिल्हाप्रमुख रमेश गव्हाड, मुरलीधर शेजुळ, परमेश्वर जगताप, माजी जि.प. अध्यक्ष उत्तमराव वानखेडे, किसान सेनेचे जिल्हा संघटक मुरलीधर थेटे, तालुकाप्रमुख हरीहर शिंदे, कुंडलिक मुठ्ठे, महिला आघाडीच्या जिल्हा संघटक मंगल मेटकर, युवासेनेचे जिल्हा युवाधिकारी शिवाजी शेजुळ, मंगेश गव्हाड, गंगुताई वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना उपनेत्या तथा महिला आघाडीच्या संपर्कप्रमुख ज्योतीताई ठाकरे म्हणाल्या की, पक्ष संघटनेत महिला आघाडीच्या बांधणीला अत्यंत महत्व आहे. येत्या निवडणुका राखीव असलेल्या महिलांच्या जागा जिंकण्यासाठी सक्रीय महिला पदाधिकार्यांची पक्षाला गरज आहे हे लक्षात घेवून महिला आघाडीची बांधणी चांगल्या प्रकारे करण्याचे आवाहन केले. लाडकी बहिणीचे नाव घेवून आलेले सरकार आता या बहिणींकडे स्पेशल दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते. तर लाडक्या बहिणीच्या यादीतील २५ ते ३० हजार लाडक्या बहिणींचे नावे वगळल्याचे दिसून येते.

जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, जालना जिल्ह्यात शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्ष बांधणीला अत्यंत महत्व देवून सातत्याने याकडे लक्ष दिले असून अनेक निष्ठावंत शिवसैनिक अत्यंत प्रामाणिकपणे पक्ष वाढीचे काम करतात. असे निष्ठावंत शिवसैनिकच पक्षाची खरी ताकद असल्याचे ते म्हणाले. सध्याचे सरकार हे अत्यंत शेतकरी विरोधी असल्याचे दिसून येते. त्यामुळे या सरकारवर ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी व सामान्य नागरिकांचा प्रचंड रोष असल्याचे दिसून येते. करीता शिवसेना पदाधिकार्यांनी सामान्य नागरिकांच्या सुख-दुःखात त्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना दिलासा द्यावा, असे आवाहनही अंबेकर यांनी केले. या बैठकांना शिवसैनिक व पदाधिकार्यांनी अत्यंत चांगला प्रतिसाद दिला. यावेळी जि.प. सदस्य बबनराव खरात, बाबुराव कायंदे, प्रभाकर उगले, शंकर जाधव, संतोष खरात, प्रभाकर खरात, पंडीत क्षिरसागर, विठ्ठल खरात, बाबासाहेब पाखरे, बाळु जाधव, दत्ता खरात, रमेश वाघ, सोनाजी खरात, हरी शेळके, तुळशीदास खरात, कृष्णा कोल्हे, गणेश खरात, मच्छिंद्र जाधव, नारायण जाधव, रमेश वाघ, गणेश दराडे, शिवाजी घडलिंग, अर्जुन शेवाळे, दत्तु तिडके, कृष्णा तिडके, बबनराव मिसाळ, रामा इंगळे, विठ्ठल इंगळे, रोशनखॉ पठाण, शेख ताजोद्दीन, रमेश वाघमारे,



सुभाष परिहार, संतोष सोलाट, दगडूबा करडेल, नितीन करडेल, शेषराव शेळके, संतोष जाधव, लक्ष्मण काळे, प्रभाकर जंवजाळ, कुरनसिंग टाटू, एकनाथ परिहार, विजय वायाळ, रमेश गायकवाड, हरिचंद्र म्हस्के, महादेव ढोके, दिपक कन्नर, लक्ष्मण शेळके, परमेश्वर गायकवाड, विष्णु म्हस्के, हरीचंद्र म्हस्के,दत्तुभाऊ सुद्रिक, जनार्धन झोरे, माजी सरपंच विष्णूभाऊ जमधडे, माजी प.स.सदस्य रमेश गायकवाड,अकोला देवचे माजी सरपंच रघुनाथ कदम, उपतालुकाप्रमुख शिवाजी म्हस्के,शहरप्रमुख देवसिंग बायस, माजी सरपंच नंदू सरडे, मुकेश माकोडे, समाधान चव्हाण, समाधान सवडे, विठ्ठल खुपटे,गजानन मुळे, संतोष घोडसे, गणेश सवडे, कांतीलाल कदम, योगेश शर्मा,गणपत बनकर, प्रल्हाद बनकर, योगेश कापसे, कुंडलिक बनकर, रामेश्वर खांडेभराड, बाबुराव सवडे, राज देशमुख,कृष्णा सवडे, साईनाथ सवडे, सुलतान कुरेशी,समीर शहा,इरफान,मोहम्मद फैसल,अय्युब कुरेशी, यांच्यासह अकोला देव

व टेंभुर्णी सर्कल मधील सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या जालना जिल्हा कार्यालयाचे उदघाटन संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) तथा राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ललित गांधी यांच्या हस्ते जालना येथील पाठक मंगल कार्यालयाजवळील इमारतीमधील जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाचे बुधवार दि.३० जुलै २०२५ रोजी दुपारी २.५० वाजता उदघाटन केले. यावेळी मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शाह आलम खान, जिल्हा व्यवस्थापक एकनाथ कांबळे, घनश्याम गोयल, विष्णू चेचाणी, सुदेश सकलेचा, चेतन देसरडा, संजयकुमार लवांडे, ॲड. निखिल जैन, नरेंद्र जोगड आदिंची उपस्थिती होती.

## राजुर चौफुली परिसरातील पुलामुळे अपघातांची शक्यता

### आश्वासनाचे ढोंग नको, कृती हवी; तातडीने उपाययोजनांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** शहराच्या मुख्य राजुर चौफुली परिसरात रस्त्यांची बिकट अवस्था आणि पावसामुळे निर्माण झालेल्या खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. अपुरे नियोजन आणि निकृष्ट दर्जाचे काम यामुळे रस्त्यावरून प्रवास करणे जीवावर बेतू लागले आहे. पावसाच्या पाण्यात रस्त्यावरील खोल खड्डे दिसत नसल्याने वाहनचालक अनेकदा त्यात अडकतात, अपघात घडतात. अरुंद रस्ता आणि दोन्ही बाजूंनी होणारी वाहतूक यामुळे वाहने वळवताना अपघातांची शक्यता आणखी वाढली आहे. विशेषतः पुलाखालील जागेतून मोठी वाहने जाताना चालकांना अक्षरशः जीवघेणी कसरत करावी लागत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, पुलाचे काम अतिशय सदोष पद्धतीने झाले असून, ते कधीही धोकादायक ठरू शकते. अशा स्थितीत नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया देत तातडीने डागडुजी करण्याची आणि नवीन दर्जेदार पुलाचे काम हाती घेण्याची मागणी केली आहे.

शहराच्या उपनगरात असलेली ही स्थिती प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. दरवेळी आश्वासनांचे ढोंग नको, आता ठोस कृती हवी, अशी रोषपूर्ण भावना नागरिकांमध्ये दिसून येत आहे.



---

# राज्य सह.बँकेचा थेट कर्जपुरवठा कितपत शक्य होईल?

राज्य सहकारी बँकेचे शेतकऱ्यांना पाठबळ आणि विकास संस्थांना राज्य सहकारी बँकेचा थेट कर्ज पुरवठा होणार अशी बातमी परवा वाचण्यात आली. सध्या शेतकऱ्यांना कर्ज पुरावा त्रिस्तरीय होतो. म्हणजे एम. एस. सी. बँके कडून( महाराष्ट्र राज्य सहकारी बँक. शिखर बँक) जिल्हा बँकेला आणि जिल्हा बँकेकडून शेतकऱ्यांना खरीप आणि रब्बी हंगामासाठी कर्ज पुरवठा होत असतो. साठ ते पासष्ट टक्के कर्जपुरवठा हा विका संस्था आणि जिल्हा बँकेचे माध्यमातून होतो.

परंतु गेल्या काही वर्षांमध्ये एकूणच परिस्थिती अशी झाली आहे की कर्जमाफी च्या घोषणाकडे डोळे लागलेले असतात. निवडणुका आल्या की कुठलाही विचार न करता कर्जमाफी होणार, सातबारा कोरा करणार, अशा बातम्या वर्तमानपत्रात,प्रसारमाध्यमातून माध्यमातून झळकू लागतात. प्रचार सभा मध्ये आश्वासन दिले जाते आणि मग ती कर्जमाफी कशी होणार ? कोणाला होणार ? किती होणार ? हे सगळं काही जाहीर झालेले नसते. फक्त कर्जमाफी होणार आणि मग त्यामुळे साहजिकच आपण जर कर्ज भरले तर आपल्याला कर्जमाफी होणार नाही. हे तितकच सत्य असत. त्यामुळे खूप सारे शेतकरी कर्ज न भरण्याचे निर्णयाप्रत येतात.

आज रोजी महाराष्ट्रात जवळपास २१००० विविध कार्यकारी सहकारी संस्था आहेत. यांची परिस्थिती बघितली तर त्या त्या भागानुसार संस्थांची परिस्थिती आहे. जो काही थोडाफार सधन भाग आहे त्या ठिकाणी विकास संस्थांची परिस्थिती बरी आहे. परंतु जवळपास ६५/७० टक्के संस्थांची परिस्थिती ही आवाक्या बाहेर गेलेली आहे. थोडक्यात या संस्थांमध्ये आणि बँक कर्जामध्ये अनिष्ट तफावत निर्माण झालेली आहे.

आता अनिष्ट तफावत म्हणजे काय ? तर बँकेचे कर्ज जास्त झाले आहे आणि संस्थेचे सभासदांकडून येणारे कर्ज त्यापेक्षा बरेच कमी आहे. म्हणजे जर एखाद्या संस्थेकडे बँकेचे ८० लाख रुपये देणे असेल तर त्या संस्थेत सभासंकडून येणे ५० लाखच रुपये दिसत आहे. म्हणजे त्यात तीस लाखांची तफावत दिसत आहे. आणि अशी तफावत मात्र कधीच भरून निघत नसते.ती वाढतच असते. ज्या वेळेला शंभर टक्के कर्ज माफ होईल आणि बँक लेव्हलला ती रक्कम जमा होऊन उर्वरित रक्कम जर बँकेला शासनाकडून मिळाली तरच ती तफावत भरून निघणार आहे नाहीतर हे असेच चक्र अव्यहातपणे सुरू राहणार आहे यात काही शंका नाही.

वि.का संस्थांना खर्चासाठी वेगळा निधी नसतो त्यांना जे मार्जिन मिळते त्यातूनच तो खर्च होत असतो. बऱ्याच वेळा अनेक संस्थांमध्ये खर्चावर नियंत्रण नसते. आदरातिथ्य, स्टेशनरी, कारकून पगार, जाहिराती,जागा भाडे, आदी गोष्टीवर खर्च होतो. आणि त्यामुळे तो खर्चही वसुलातूनच होत असल्यामुळे तफावत पडत असते. अजून एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संस्था पातळीवर अल्पमुदत कर्जावरील व्याज मुद्दला इतकेच घेतले जाते. त्यावरती व्याज आकारणी होत नाही परंतु बँक पातळीवर बँक संस्थेकडून व्याज वसूलच करत असते त्यामुळे दोघांचे कर्जामध्ये तफात पडते.

राज्यातील ३१ जिल्हा सहकारी बँकांपैकी जवळपास २० बँका अडचणीत आहेत. त्यामुळे या जिल्ह्यातील विविध कार्यकारी सोसायट्यांना जिल्हा बँकेकडून होणार वित्त पुरवठा बंद झाला आहे. कर्ज मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत येत असून यात लक्ष घालून शेतकऱ्यांना मदत करण्याची सूचना महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केली होती. त्यानुसार राज्य सहकारी बँकेने थेट विविध कार्यकारी सोसायट्यांना वित्त पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे आणि कार्यवाहीलाही सुरुवात झाली आहे. असे म्हटले आहे.

या निर्णयामुळे राज्यातील हजारो सेवा सोसायट्यांना आधार मिळणार आहे.अशी भावना आहे. हे किती प्रमाणात शक्य होते हे येत्या काही दिवसात समजेलच.

आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या किंवा बंद पडलेल्या काही जिल्हा बँकामधून विविध कार्यकारी सोसायट्यांना वित्त पुरवठा होत




नव्हता. त्यामुळे अनेक गावातील शेतकऱ्यांना हंगामासाठी कर्ज मिळू शकत नाही. त्यामुळे हंगामासाठी पैसे हवे असतील तर इतर पर्यायांचा अवलंब करावा लागत असल्याची बाब शेतकऱ्यांनी आणि संस्थांनी निदर्शनास आणून दिली होती.

राज्य सहकारी बँकचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी आता या विविध कार्यकारी सोसायट्यांनाही काही निकष पाळून वित्त पुरवठ्याबाबत राज्य सहकारी बँकेशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. ज्या विविध कार्यकारी सोसायट्या गेली तीन वर्षे नफ्यात आहेत, ज्यांचा एनपीए १० टक्क्यांपेक्षा कमी आहे आणि आर्थिक दृष्ट्या सक्षम आहेत, अशा सोसायट्यांना थेट वित्त पुरवठा करण्याचा निर्णय राज्य सहकारी बँकेने घेतला आहे.

अशा संस्थांनी जिल्हा बँकांमार्फत कर्जाची मागणी करायची आहे. जर राज्य सहकारी बँक थेट संस्थांना कर्ज पुरवठा करणार आहेत. तर मग त्यात जिल्हा सहकारी बँकेचा रोल काय असेल? कारण याआधी कर्ज वाटपाची त्रिस्तरीय व्यवस्था होतीच आणि आहे. राज्य सहकारी बँक जिल्हा बँकांना आणि जिल्हा बँका विविध कार्यकारी संस्थांना कर्ज पुरवठा करते. परंतु जाहीर निकषावर थेट कर्ज पुरवठा होणार असेल तर राहिलेल्या विकास संस्थांनी काय करावे ? त्यांना जिल्हा बँका कर्ज पूरवठा करणार का? हे सर्व प्रश्नांची उकल होत नाही.

जवळपास ६० ते ६५ टक्के संस्था या अनिष्ट तफावत आहे. या सोसायट्यांचे बाबतीत जर बघितले तर त्यांचा जो वसूल येतो तो संपूर्ण किंवा जवळपास बँक व्याजामध्ये जमा होतो. तो मुद्दलात थोडाफार जमा होतो, त्यामुळे एखाद्या संस्थेत जर ५०० कर्जदार सभासद असतील त्यातील दरवर्षी साधारणपणे दीडशे दोनशे कर्जदार आपले कर्ज निमित भारतात पण कर्जमाफीच्या घोषणामुळे जे काही नियमीत कर्ज भरणारे सभासद असतात तेही विचारात पडतात आणि आपण जर कर्ज भरले तर आपल्याला माफी मिळणार नाही म्हणून तेही कर्ज भरायला टाळाटाळ करत असतात. काही सभासद असे असतात की जे संस्थेचे सभासद कमी होवून राष्ट्रीयकृत बँकांकडे पलायन करतात. त्यामुळे इकडे सभासद संख्याही कमी होते. नियमित कर्ज भरणाऱ्यांना जरी काही प्रोत्साहन देण्याची घोषणा असते तरी ते केव्हा मिळतील याची शाश्वती नसते.

जिल्हा बँकेचा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत म्हणजे विविध कार्यकारी संस्थामार्फत शेतकऱ्यांना दिल्या जाणारे खरीप रब्बी मध्यम मुदत कर्जा वरील व्याज हेच आहे. त्यातही बऱ्याच विकास संस्था मध्यम मुदत कर्ज देण्यासाठी अपात्र असतात म्हणजेच नियमात बसत नाही म्हणून असे कर्ज हे कमीच असते आणि बऱ्याच वेळा अशा कर्जामध्ये फसवणूक केली जाते आणि त्या कर्जाचा योग्य प्रकारे होत नसतो. काही ठरावीक संस्थाच आपला स्वतःचा व्यवसाय करून काही उत्पन्न मिळवतात जसे पेट्रोल पंप, गोडावून बांधकाम स्वस्त धान्य दुकान अशाप्रकारे.

जिल्हा बँका अडचणीत किंवा डबघाईला अनेक कारणे आहेत त्यात महत्त्वाचे म्हणजे होणारा अवाजवी खर्च. वाहनावरील खर्च, नूतनीकरण खर्च, स्टेशनरी आणि फर्निचर खर्च आणि त्यात वेळोवेळी होणारा भ्रष्टाचार.अकार्यक्षम कार्यकारी संचालकांच्या नेमणुका, याचबरोबर अजून एक महत्वाची म्हणजे पीक कर्ज व्यतिरिक्त जिल्हा बँका वैयक्तिक कर्ज देत नाहीत आणि दिले तरी योग्य रीतीने परतफेड होत नाही. तसेच राजकीय हेतूने सूतगिरण्या, साखर कारखाने,शिक्षण संस्था, नगरपालिका, यांना दिलेले कर्जही मोठ्या प्रमाणात थकीत असते व त्याला योग्यरित्या तारण नसते असे राजकीय संबंधापोटी बऱ्याच वेळा दिलेले कर्ज धोक्यात येते आणि त्यामुळेही मोठ्या प्रमाणावर फटका बँकांना बसतो. आणि मग त्या बँका अडचणीत येतात.

कितीही वेळा आर्थिक गणिते जुळण्यासाठी मदत केली तर ती कमीच ठरणार आहे. तीन-चार वर्षांपूर्वी अशाच प्रकारे अडचणीत आलेल्या बँकांचे विलीनीकरण करण्याविषयी खूप चर्चा झाली होती पण त्यानंतर तेही बारगळले.

विविध कार्यकारी सेवा संस्था सक्षम असतील तर जिल्हा बँकाही सक्षम राहतील, फक्त दोघांनीही खर्चावर नियंत्रण ठेवून आर्थिक शिस्त आणावी हे महत्त्वाचे आहे. अन्यथा त्याकडे दुर्लक्ष झाल्यास सहकार चळवळीच्या दृष्टीने ती अत्यंत घातक गोष्ट ठरणार आहे हे विसरून चालणार नाही. त्यादृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे.आपले राज्याचे केंद्रीय सहकार मंत्री या कामी लक्षणीय बदल घडवून आणतील ही अपेक्षा.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव.**
**मोबा.८९९९५६६९१७**
dilipdeshpande24gmail.com

---

### व्यवस्थापकाने केलेल्या घृणास्पद कृत्यावर NSUI आक्रमक

## दोषींवर तत्काळ कारवाईची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा परिषदेच्या निवासी क्रीडा संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थिनीबाबत व्यवस्थापकाने केलेल्या अमानवी कृत्यावरून राज्यभरात संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी काँग्रेस (NSUI) तर्फे जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देत संबंधित व्यवस्थापक व इतर दोषींना तात्काळ बडतर्फ करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, देशाचे क्रीडा भविष्य असलेल्या विद्यार्थिनींना अशा प्रकारचा मानसिक व शारीरिक त्रास देणं हे निंदनीय असून प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली पाहिजे. दोषींवर तातडीने कारवाई न झाल्यास छ्डणख तर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

यावेळी NSUI प्रदेश अध्यक्ष सागर साळुंके, शेख युसूफ, डॉ. निलेश अंबेवाडीकर, सुरज यलगंठवार, खालेद पठाण, अनिस पटेल, शेख अथर, आकाश रगडे, रोहित बनकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते. विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर असून, जिल्हा प्रशासनाने यावर तात्काळ कार्यवाही केली नाही तर या प्रकरणाची झळ संपूर्ण व्यवस्थेला बसू शकते, असा इशाराही यावेळी NSUI तर्फे देण्यात आला.

## अल्पसंख्याक विकासासाठी ठोस पावले उचला

### ललित गांधी यांचा प्रशासनाला निर्देश

**जालना । प्रतिनिधी -** जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष व राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य (राज्यमंत्री दर्जा) ललित गांधी यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा प्रशासनासोबत बैठक घेऊन अल्पसंख्याक बहुल भागातील विकासकामांचा आढावा घेतला. दुपारी ३ वाजता झालेल्या या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील सूर्यवंशी, जिल्हा व्यवस्थापक एकनाथ कांबळे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता स्मिता पवार आदी अधिकारी उपस्थित होते. ललित गांधी यांनी बैठकीत स्पष्टपणे सांगितले की, जालना जिल्ह्यात १२२ मदरसे व शाळा आहेत, त्यापैकी जैन समाजाच्या चार शाळा असून त्यांना पायाभूत सुविधा तातडीने पुरवाव्यात. अल्पसंख्याक बहुल भागातील अपूर्ण विकासकामे - रस्ते, गटारी, सभागृह - लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. गुरु गणेश भवनाला 'ब वर्ग तीर्थक्षेत्र' तर प्राचीन जैन मंदिरांना 'क वर्ग तीर्थक्षेत्र' दर्जा देण्यासाठी तातडीने प्रस्ताव पाठवण्याचे त्यांनी सुचवले. तसेच सदर बाजार येथील जैन मंदिरासमोरील रस्ता वन-वे करावा आणि रुंदीकरणाची प्रक्रिया त्वरीत सुरू करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

# जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत ‘महसूल सप्ताह’ चे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** महसूल विभागामार्फत राज्यात १ ऑगस्ट हा ‘महसूल दिन’ साजरा करण्याबरोबरच १ ते ७ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत ‘महसूल सप्ताह’ देखील साजरा करण्यात येणार असल्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. महसूल विभागामार्फत जिल्हास्तरीय महसूल कामे वेळेत पूर्ण करुन त्यानुसार अभिलेख अद्ययावत करणे, वसूलीच्या नोटीस पाठवणे, मोजणी करणे इत्यादी कामे वेळापत्रकानुसार करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा आणि महसूल उद्दिष्ट पूर्ण करणारे अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यासाठी दरवर्षी प्रमाणे १ ऑगस्ट, २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांच्या मार्फत ‘महसूल दिन’ साजरा करण्यात येणार आहे. तसेच या वर्षी १ ते ७ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत ‘महसूल सप्ताह’ साजरा करण्यात येणार आहे.

या महसूल सप्ताहाच्या कालावधीत कार्यक्रमाचे स्वरुप पूढील प्रमाणे असणार आहे. यामध्ये १ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करुन ‘महसूल सप्ताह’ चे शुभारंभ करण्यात येणार आहे. तसेच रोजी महसूल संवर्गातील कार्यरत/सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी संवाद उत्कृष्ट अधिकारी/कर्मचारी पुरस्कार वितरण व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण समारंभ होणार आहे. तर २ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटूंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटूंबांना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करणेबाबत कार्यक्रम घेण्यात येणार आहे. ३ ऑगस्ट रोजी पाणंद/शिवरस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्यात येणार आहे. ४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळनिहाय राबविण्यात येणार आहे. ५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करुन डीबीटी करुन अनुदानाचे वाटप करण्यात येणार आहे. ६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करणे व त्या अतिक्रमणमुक्त करणे, तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासन धोरणानुसार (नियमानुकूल करणे/सरकारजमा करणे) निर्णय घेण्यात येणार आहे. तसेच ७ ऑग्सट रोजी च-डरपव धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे (डजझ प्रमाणे) धोरण पूर्णत्वास नेणे आणि महसूल सप्ताहाचा सांगता समारंभ होणार आहे.

या कार्यक्रमांचे नियोजन करुन याबाबतची प्रचार व प्रसिध्दी करण्याबरोबरच महसूल विभाग, भूमी अभिलेख आणि नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक या विभागाशी संबंधीत योजनांची माहिती विशद करणाऱ्या लघुचित्रफिती तयार करण्यात येणार असून, या लघु चित्रफिती विविध प्रसारमाध्यमांद्वारे जनते पर्यंत पोहचविण्यात येणार आहे. तसेच या विभागाच्या योजनांच्या अनुषंगाने विशेष शिबीरे / कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येक जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार कार्यालयांमध्ये हेल्पडेस्क, हेल्पलाईन तयार करुन मदत करण्याकरिता यंत्रणा कक्ष करण्यात येणार आहे. ‘महसूल सप्ताह’ दरम्यान शासनाचे महत्वाचे कायदे, विकास योजना, उपक्रम, धोरणे यास प्रसिध्दी देण्यासाठी सखोल माहिती असलेल्या तज्ज्ञांच्या मुलाखती तसेच व्याख्यानाचे प्रक्षेपण स्थानिक वृत्त वाहिन्यावर करण्यात येणार आहे. महसूल विभागामार्फत देण्यात येणारे विविध दाखले आणि प्रमाणपत्रे, त्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्राबाबतची माहिती पत्रके तयार करुन नागरिकांना देण्यात येणार आहे. तरी या महसूल सप्ताहात जिल्ह्यातील सर्व घटकातील नागरिकांना सहभागी होवून लाभ घ्यावा, असे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

# रद्द करण्यात आलेला कत्तलखाना पुर्ववत सुरु करा

## पशुसंवर्धन उपायुक्तांना कुरेशी समाजाचे निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** जालन्यातील रद्द करण्यात आलेला जनावरांचा कत्तलखाना पुर्ववत सुरु करा ,हा कत्तलखाना सुरु होत नसेल तर आमच्या कुटुंबियांना शासकीय नोकरी द्या अशी मागणी कुरेशी समाजाच्या वतीने पशुसंवर्धन उपायुक्तांकडे करण्यात आली आहे.जर या मागणीचा गांभीर्याने विचार केला नाही तर आंदोलनाचाही ईशारा देण्यात आला आहे.

शेकडो वर्षापासून कृषी आणि पशु उद्योगाचा धंदा हा प्रामुख्याने उपजिविकेचा स्त्रोत राहिलेला आहे. भारत एक कृषी प्रधान देश आहे. देशातील सर्वाधिक लोक आणि जनता हा कृषी आणि पशुपालनाच्या धंदयावर अवलंबून आहे. शेतकरी आणि कुरैशी समाज पशु खरेदी विक्रीच्या व्यवसायात अनेक वर्षांपासून टिकून आहे. पशु खरेदी विक्री कुरेशी सम ाजाचा पारंपरिक आणि पिढ्या न पिढ्या चालत आलेला वंशपरंपरागत व्यवसाय आहे. कुरेशी समाज हा पशु खरेदी विक्री बरोबरच दुध किंवा चारांच्या मांस विक्रीचा व्यापार पिढयानपिढयापासून करत आहे. १९७६ मध्ये गो हत्या कायदा अस्तित्वात आल्यानंतर गो- हत्या मांस खरेदी विक्रीचा व्यवसाय बंद करण्यात आला.पण बैल नर प्रजातीच्या मांस विक्रीचा व्यवसाय सुरू होता. २०१५ मध्ये गोवंश हत्याबंदी कायदा आल्यानंतर बैल नर प्रजातीच्या मांस विक्रीचा व्यवसाय सुद्धा बंद करण्यात आला. त्यामुळे जालना येथे कत्तलखाण्यासाठी जमिन देण्यात आली होती. मात्र, जालन्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी केवळ एका गटाची बाजू लक्षात घेऊन आम्हाला विश्वासात न घेता येथील कत्तलखांना रद्द केला. त्यामुळे हा रद्द करण्यात आलेला कत्तलखाना पुन्हा सुरु करण्यात यावा अशी मागणी कुरेशी समाजाने केली आहे.

गेल्या वीस वर्षापासून नगर परिषदेअंतर्गत मांस विक्रीचे परवाने देण्यात येत होते. मात्र, जालना शहर महानगर पालिका झाल्यापासून हे परवाने देण्यात येत नाहीत. यात सुधारणा करून परवाने पुर्ववत देण्यात यावे.ज्या प्रमाणे छत्रपती संभाजीनगर , मुंबई, हिंगोली, पार्थी, नागपूर अशा विविध ठिकाणी असलेल्या बफेलो बीफ एक्सपोर्ट कंपनी सारखी शासकीय एक्सपोर्ट कंपनी ही जालना शहरात सुरु करण्यात यावी. अथवा पब्लिक प्रायव्हेट पद्धतीने कंपनी स्थापन करण्यासाठी जमिन देण्यात यावी. यामुळे जालन्यात रोजगारही निर्माण होईल.कृषि उत्पन्न बाजार समितीकडून पशू खरेदी-विक्रीसाठीची परवान्याची प्रक्रिया जटील करण्यात आलेली आहे. गेल्या काही महिन्यांपासून तर परवाने देण्यात येत नाहीत. तर ही जटील प्रक्रिया सोपी करण्यात येऊन खरेदी-विक्रीचे परवाने देण्यात यावे.

या मागण्यांचा गांभीर्याने विचार करुन त्वरीत मागण्या मान्य करण्यात याव्यात. अन्यथा आमचा समाज या सर्व बाबींमुळे मेटाकुटीला आलेला आहे. जर मागण्या मान्य होत नसतील तर समाजातील प्रत्येकास शासकीय नोकरीत सामाविष्ट करण्यात यावे.

वरिल मागण्यांचा गांभीर्याने विचार करुन त्वरीत मागण्या मान्य करण्यात याव्यात अन्यथा मागण्या मान्य होईपर्यंत साखळी उपोषण करण्यात येईल आणि होणाऱ्या परिणामास आपण जबाबदार राहाल असा ईशारा कुरेशी समाजाने दिलेला आहे.

जिल्हाध्यक्ष मोहम्मद. असलम कुरेशी, मोईन कुरेशी, जावेद भाई कुरेशी, हनिफ कुरेशी, नाज़ीम कुरेशी,शाहनवाज़ कुरेशी यांच्यासह आदींची उपस्थिती होती.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.